**एतदर्थ मंडळ (मराठी प्रशिक्षण व परीक्षा), महाराष्ट्र शासन**

भाषा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, प्रशासकीय इमारत, ५ वा मजला,
डॉ.आंबेडकर उद्यानाजवळ, शासकीय वसाहत, वांद्रे (पूर्व), मुंबई- ४०० ०५१.

# राजपत्रित अधिकाऱ्यांसाठी मराठी भाषा उच्चस्तर परीक्षा

## प्रश्नपत्रिका एक - विहित पाठ्यपुस्तक व कार्यरूप व्याकरण

रविवार, दिनांक ३ जानेवारी, २०२१

वेळ :- सकाळी १०.३० ते दुपारी १.१५

**(तोंडी परीक्षेस लागणारा वेळ धरून)**

**(एकूण गुण १००)**

---

**सूचना :-** (१) नवीन प्रश्न नवीन पानावर सोडवावा.

(२) प्रत्येक प्रश्नाचे **गुण** त्या त्या प्रश्नासमोर नमूद केले आहेत.

(३) प्रश्नासमोर दिलेल्या सूचनांचे काटेकोरपणे पालन करावे अन्यथा पूर्ण गुण दिले जाणार नाहीत

गुण

प्रश्न क्र १. पुढील उतारा वाचून त्याखालील प्रश्नांची उत्तरे लिहा. १०

माझ्या बालमित्रांनो, मी तुमच्याएवढा होतो तेव्हा अगदी तुमच्यासारखाच खेळकर, खोडकर व उपद्व्यापी होतो! माझा जन्म पुण्यातच एका गरीब कुटुंबात झाला. माझे वडील त्या वेळेस पोलीस खात्यामध्ये तुटपुंज्या पगारावर नोकरी करत होते. तेव्हा साहजिकच गरीब कुटुंबाच्या वाट्याला येणारे सारे कष्ट व दु:खे आम्ही भोगत होतो. अशा परिस्थितीत वडिलांना आम्हां मुलांसाठी खेळणी विकत घेणे शक्यच नव्हते. दुस-या मुलांच्या हातात खेळणी पाहून आम्हांला त्यांचा हेवा वाटत असे. तरी पण गल्लीतील मुलांना जमा करून उन्हातान्हात विटी दांडू खेळणे, पतंग उडवणे, कधीमधी कॅम्पमधील कॅनॉल मध्ये चोरून पोहणे; कै-या, पेरू पाडून त्यांचा यथेच्छ स्वाद घेणे, घरात जळणासाठी आणलेल्या लाकडांतूनच बॅट व स्टंप तयार करणे व कुठून तरी जुना पुराणा बॉल पैदा करून क्रिकेट खेळणे असा माझा दिवसभराचा कार्यक्रम असायचा. संध्याकाळी घरी येईपर्यंत माझ्याबद्दल ब-याच तक्रारी आईच्या कानांवर आलेल्या असायच्या. दिवसभराच्या खेळाने भूक तर खूपच लागलेली असायची. घरात पाऊल ठेवतो न ठेवतो तोच पाठीवर धम्मक लाडू व चापटपोळ्यांचा यथेच्छ वर्षाव व्हायचा. मग मी घरात एका कोप-यात जाऊन रडत बसायचा! तिथेच झोप लागायची आणि जाग यायची ती आईच्या प्रेमळ कुशीत.

नंतर माझ्या वडिलांची बदली वडगावला झाली. त्याचा परिणाम असा झाला, की मला व माझ्या थोरल्या भावाला शाळेसाठी पुण्यातच काकांकडे राहावे लागले. त्यावेळेस मी अवघा नऊ-दहा वर्षांचा असेन. त्या लहान वयात आई-वडिलांपासून दूर राहणे माझ्या जिवावर येई. खूप रडायला यायचे; पण त्याचा काही उपयोग व्हायचा नाही. हट्टही करून बघितला, पण व्यर्थ. आम्हांला सोडून जाणे आई- वडिलांच्याही जिवावर आले होते; परंतु मुलाने चांगले शिकावे, मोठा ऑफिसर व्हावे व घराण्याचे नाव उज्ज्वल करावे या उद्देशाने त्यांनी कसेबसे मन घट्ट करून आमचा निरोप घेतला.

गुण

त्यानंतर माझ्या आयुष्याला एक निराळेच वळण लागले. माझे चुलते पुण्याच्या वाय, एम. सी. एच्या कंपाऊंडमध्ये राहत असत. ही संस्था खेळाकरिता प्रसिद्ध असल्या कारणाने बरेच लोक या संस्थेचे सभासद होते. रोज सकाळ-संध्याकाळ ज्यांना जसे जमेल त्याप्रमाणे ते खेळायला येत असत. साहजिकच याचा परिणाम माझ्या बालमनावर होई. मुळातच खेळाची आवड जास्त असल्याने मी त्या सभासदांचा खेळ लक्ष देऊ न पाहू लागलो. अनेक खेळाडू पाहण्याची मला रोज संधी मिळू लागली. शाळा सुटली न सुटली तोच धावत येऊन मी प्रथम ग्राऊंडवर हजर होत असे. सर्व खेळांत मला क्रिकेटचा खेळ फार आवडू लागला. या खेळानेच मला जास्त भुरळ पाडली. कधी कधी, काही खेळाडू स्वत:ला भरपूर खेळायला मिळावे म्हणून लवकर येत असत. कोणी नाही असे पाहून ते मला चेंडू फेकायला बोलवत. मी अशा कामासाठी नेहमीच तयार असायचा.

खालील प्रश्नांची उत्तरे लिहा :-

(अ) चंदू बोर्डे यांचा दिवसभराचा कार्यक्रम कोणता असायचा?
(ब) वडिलांना मुलांसाठी खेळणी विकत घेणे का शक्य नव्हते?
(क) लेखक व त्यांच्या थोरल्या भावाला काकांकडे पुण्यातच का रहावे लागले?
(ड) चंदू बोर्डे यांना अनेक खेळाडू पहाण्याची संधी कशी मिळू लागली?
(इ) लेखकाच्या बालमनावर कोणत्या गोष्टीचा परिणाम होई?

प्रश्न क्र २. खालीलपैकी कोणत्याही पाच प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी ५ ते ६ ओळींत लिहा. २०

(अ) 'चाळसंस्कृती' चे 'उपास' या पाठातून होणारे दर्शन स्पष्ट करा.
(ब) मेटलायझिंग प्रक्रियेवर काम न होण्यामागची कारणे लिहा?
(क) दाजीसाहेबांनी अब्दुलचा सत्कार का केला, सकारण लिहा.
(ड) पावडेकाका पर्यावरणास मारक अशी कोणती कृती करतात?
(इ) आपल्या शालेय शिक्षणातील अडचणींचे वर्णन माशेलकर यांनी कसे केले आहे?
(फ) 'जगणं कॅक्टसच' या पाठाच्या आधारे कॅक्टसच्या प्रकारांची माहिती थोडक्यात लिहा.

प्रश्न क्र ३. (अ) खालीलपैकी कोणत्याही दहा प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी एका वाक्यात लिहा. १०

(अ) चातक पक्षी कोणाची विनवणी करतो?
(ब) रा. ग. जाधव विश्वकोशाचे अध्यक्ष म्हणून कोणत्या ठिकाणी गेले होते?
(क) पंतांच्या वजन घटवण्याच्या व्रताची वार्ता पहिल्या दिवशी कोठे गेली?
(ड) अब्दुलचे दुकान बंद असल्याने कोणाचा धंदा तेजीत चालणार होता?
(इ) सुमितच्या अॅपचे नाव काय?

[ उलटून पहा. ]

गुण

(फ) उदरनिर्वाहासाठी माशेलकर आणि त्यांच्या आईला कुठे जावे लागले?
(ग) जवानाचे रक्षण कसे होणार आहे?
(ह) मराठी माणसाचा ऊर अभिमानाने केव्हा भरून आला?
(य) झाडाच्या मुळावर घाव घातला तर झाड काय करते?
(र) क्रिकेट खेळत असल्याबद्दल लेखक चंदू बोर्डे यांस काय वाटले?
(ल) निरंजनने स्टेशन मास्तरांना काय सांगितले?
(व) कवी पाठक शेतामधून काय पिकवायला सांगता?

(ब) खालील काव्यपंक्तींचे रसग्रहण करा. ५

(१) फुलाफुलांचे दाट ताटवे, जिथे पोचते दृष्टी
रंग मजेचे, रंग उदयाचे जपून ठेवू सृष्टी

(२) तुझी विजयाची दौड
डोळे भरून पहावी;
डोळ्यांतील आसवांची
ज्योत ज्योत पाजळावी.

(३) पक्षी झाडांचे कुणीच नसतात
तरीही झाड त्यांचं असतं

प्रश्न क्र ४. खालीलपैकी कोणत्याही दहा रिकाम्या जागी योग्य शब्द लिहा. १०

(अ) भुकेलें वत्सरावें |-------हुंबरत धांवे ||
(ब) अभाग्यांना सन्मानाच्या ------- तरी द्याव्यात!
(क) आमच्या चाळीतल्या लोकांनी माझ्या उपासाची ------- केली होती.
(ड) झोतभट्टीत शेकावे ------ तसे आयुष्य छान शेकले.
(इ) आंब्याच्या झाडाखाली असलेल्या -----अब्दुल बसला.
(फ) किती प्रचंड -----चिकटलेला असतो, आपल्या पायांना ! ग्लोबल वॉर्मिंगला हातभार लावतो आपण.
(ग)--------एक आंतरिक ओढ वाटू लागली.
(ह) माझं रंगमंचावर सादरीकरण होणार याचे भान ठेवूनच -------माझी मांडणी करतो.
(य) एका ------- झाडाखाली, बांबूमध्ये बिबळा बसला होता.

[ उलटून पहा. ]

गुण

(र) उधळू, फेकू बिया डोंगरी, रूजतील --------झाडे.

(ल) पक्ष्यांच्या --------- नादात झाडाचंही जीवनाचं एक संथ गाणे दडलेले असते.

प्रश्न क्र ५. (अ) खालीलपैकी कोणत्याही पाच वाक्प्रचारांचा अर्थ सांगून वाक्यात उपयोग करा. १०

(१) हकालपट्टी होणे
(२) सक्त ताकीद देणे
(३) अवहेलना करणे
(४) गौरव वाटणे
(५) दुरूत्तरे करणे
(६) वर्ज्य करणे

(ब) खालीलपैकी कोणत्याही पाच शब्दांचे अर्थ लिहा. ५

(१) कटाक्ष
(२) वायू
(३) उद्योग
(४) जन
(५) तेज
(६) जीवन

प्रश्न क्र ६. (अ) पुढीलपैकी कोणत्याही पाच रिकाम्या जागी योग्य ते नाम लिहा. ५

(१) मी शनिवार पेठेतील --------मंदिराच्या पुलावर बहुधा रोज संध्याकाळी जात असे.
(२) -------,कॉलिफ्लॉवर वगैरे बाळसेदार मंडळींची स्वयंपाक घरातून हकालपट्टी झाली.
(३) ------ मेघरहित निळ्या नितळाईने नटले होते.
(४) आयुष्याचं फार मोठं तत्वज्ञान मला -------- सरांच्या या शिकवणुकीतून गवसलं.
(५) बांबूमध्ये ------- बसला होता.
(६) कॅक्टस हे ---------- खंडातले झाड आहे.

(ब) खालीलपैकी कोणत्याही पाच अधोरेखित शब्दांचे लिंग ओळखा. ५

(१) बाळ कडाक्याच्या <u>थंडीने</u> कुडकुडत रडत होते.
(२) अमरावतीहून आलेली <u>निमंत्रित</u> मंडळी मोटारीतून जाणार होती.
(३) अंबादेवीच्या चौकात <u>मोटार</u> थांबली.
(४) निळ्याशार तुकड्यावर <u>चांदणं</u>, उमलल्याचा त्यांना भास झाला.
(५) एके दिवशी शाळेत त्यांनी एक <u>प्रयोग</u> करून दाखवला.
(६) <u>कॅक्टसच्या</u> अनेक जाती आहेत.

[ उलटून पहा. ]

गुण

(क) पुढीलपैकी कोणत्याही पाच नामांची वचने बदला. ५

(१) पाखरू (२) खेडे

(३) वासरू (४) वृक्ष

(५) कळी (६) शिक्षिका

(ड) पुढीलपैकी कोणत्याही पाच शब्दांपासून नामे बनवा. ५

(१) सार्वभौमिक (२) लाक्षणिक

(३) तार्किक (४) धार्मिक

(५) प्राथमिक (६) वैचारिक

(इ) पुढीलपैकी कोणत्याही पाच शब्दांच्या संधी सोडवा. ५

(१) सूर्यास्त (२) सज्जन

(३) गणाधीश (४) चिदानंद

(५) देवालय (६) वृध्दाश्रम

(फ) कंसात दिलेल्या सूचनांप्रमाणे बदल करून कोणतीही पाच वाक्ये पुन्हा लिहा. ५

(१) अब्दूलने एकवार तीच्याकडे बघितले.
(वाक्य शुद्ध करून लिहा.)

(२) **बोलण्याचा आणि खाण्याचा संबंध काय?**
(अधोरेखित शब्दांच्या जाती ओळखा.)

(३) तुमचे घर अतिशय छान आहे.
(वाक्याचा प्रकार ओळखा.)

(४) रंगीबेरंगी बांगड्याकडे मोठ्या कौतुकाने त्याने बघितले.
(कर्त्याचे लिंग बदल करा.)

(५) लोकांनी तयार केलेली सुंदर फुलदाणी अब्दुलला मिळाली.
(विशेषण ओळखा.)

(६) मी गावाला जाईन.
(वाक्यातील काळ ओळखा.)

**एतदर्थ मंडळ (मराठी प्रशिक्षण व परीक्षा), महाराष्ट्र शासन**

भाषा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, प्रशासकीय इमारत, ५ वा मजला, डॉ.आंबेडकर उद्यानाजवळ, शासकीय वसाहत, वांद्रे (पूर्व), मुंबई- ४०० ०५१.

**राजपत्रित अधिकाऱ्यांसाठी मराठी भाषा उच्चस्तर परीक्षा**

**प्रश्नपत्रिका दोन - सुसंगत लेखन व अनुवाद**

रविवार, दिनांक ३ जानेवारी, २०२१

वेळ :- दुपारी २.१५ ते सायंकाळी ४.४५

**(एकूण गुण १००)**

---

**सूचना :-** (१) नवीन प्रश्न नवीन पानावर सोडवावा.

(२) प्रत्येक प्रश्नाचे **गुण** त्या त्या प्रश्नासमोर नमूद केले आहेत.

(३) प्रश्नासमोर दिलेल्या सूचनांचे काटेकोरपणे पालन करावे अन्यथा पूर्ण गुण दिले जाणार नाहीत

गुण

१. खालीलपैकी कोणत्याही एका विषयावर सुमारे १५ ते २० ओळींत तुमचे विचार मांडा. २०

(अ) लोकशाही आणि निवडणुका

(ब) माझी सुखाची कल्पना

२. खालीलपैकी कोणत्याही एका विषयावर चर्चा करा. २०

(अ) स्वच्छ भारतासाठी मी काय करू शकते/ शकतो याविषयी चर्चा करा.

(ब) लोकसंख्या वाढ एक समस्या याविषयी चर्चा करा.

३. खालीलपैकी कोणत्याही दोन बाबी तयार करा. ३०

(अ) श्री. सदानंद कापसे यांनी प्रॉव्हिडंट फंडातून रू २०,००० कर्ज मिळवण्यासंबंधी मा. शिक्षणाधिकारी, जि. प. पुणे यांच्याकडे अर्ज़ केला आहे याविषयी टिप्पणी व पत्राचे प्रारूप तयार करा.

(ब) तुमच्या भागातील पदपथावर फेरीवाल्यांचे आक्रमण झाल्याने पदपथावरून चालणे अशक्य झाले आहे त्या संदर्भात महानगरपालिका आयुक्तांना विनंतीपत्र लिहा.

(क) पाण्याच्या अनिश्चित वेळा आणि कमी दाब यांविषयी तुमच्या विभागातील नगरपालिकेच्या पाणीपुरवठा विभागाला विनंतीपत्र लिहा.

(ड) विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक सहली आयोजनाबाबत परिपत्रक तयार करा.

[ उलटून पहा. ]

गुण

४. खालीलपैकी कोणत्याही पाच इंग्रजी शब्द प्रयोगांसाठी मराठी पर्याय द्या. ५

(अ) Industrialization

(ब) Hygiene

(क) Barometer

(ड) Minute book

(इ) Procession

(फ) Noteworthy

५. खालीलपैकी कोणत्याही पाच वाक्यांचे मराठीत भाषांतर करा. १०

(अ) Vacation and resignation of, and removal from, the offices of chairman and Deputy Chairman.

(ब) Discharge of the functions of the Governor in certain contingencies.

(क) Abolition or creation of Legislative Councils in states.

(ड) Courts not to inquire into proceedings of the Legislature.

(इ) Extension of Jurisdiction of High Courts to Union Territories.

(फ) Application of the provisions of this chapter to certain class or classes of magistrates.

६. खालील उता-याचे मराठीत भाषांतर करा. १५

Subhashchandra Bose was born on the 23rd of January, 1879 in cuttack. His father Janakidas Bose was a renowned lawyer. Subhashchandra completed his primary education in Cuttack. He passed his Matriculation examination in 1913. He completed his B.A from the Presidency college, Kolkata with First Class. He immediately got a government job but seeing the bad condition on the country, he quit his job. After that he started participating in the freedom movement under the leadership of Chittaranjan Das, a well-known patriot of Bengal. He was an extremist from the beginning itself. But he had deep respect for Gandhiji. He participated in the Non-Cooperation Movement and in the Dandi March with Gandhiji. Mr. Chittaranjan Dasgupta, the Mayor of Kolkata Corporation. During this period the British arrested him by raising false charges of assassination of a British officer and sent him to the prison at Mandalay. He was also the Mayor of the Kolkata Congress Corporation and the President of the Kolkata session of the congress.

-----------------------